# आंतरराष्ट्रीय विधवा दिनानिमित्त नवी मुंबईत आठ ठिकाणी विविध उपक्रमांचे आयोजन




**नवी मुंबई, दि. २३ (वार्ताहर) :** आंतरराष्ट्रीय विधवा दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या समाजविकास विभागातर्फे शहरातील आठ ठिकाणी विविध जनजागृती व सक्षमीकरणपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. संयुक्त राष्ट्रसंघाने निश्चित केलेल्या या दिनानिमित्त एकल महिलांसाठी शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यासह त्यांचे प्रश्न जाणून घेण्यावर भर देण्यात आला. या कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने एकल महिलांनी सहभाग घेतला.

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून विधवा व एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेण्यात आला. यावेळी केंद्र शासन, राज्य शासन आणि महानगरपालिका प्रशासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या रोजगार, स्वयंरोजगार आणि उपजीविकाविषयक विविध कल्याणकारी योजनांची माहिती महिलांना देण्यात आली. तसेच बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबन कसे साधता येईल, याविषयी मार्गदर्शन करून बचत गट स्थापन करण्याची प्रक्रिया समजावून सांगण्यात आली.

कार्यक्रमादरम्यान एकल महिलांना भेडसावणाऱ्या विविध समस्या, अडचणी, सूचना आणि अपेक्षा जाणून घेण्यात आल्या. महिलांनी शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन आर्थिक व सामाजिकदृष्ट्या सक्षम व्हावे, असे आवाहन उपस्थित लोकप्रतिनिधींनी केले. विविध केंद्रांवर झालेल्या कार्यक्रमांना महिला लोकप्रतिनिधींसह अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यांनी महिलांशी थेट संवाद साधून त्यांना उपलब्ध योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित केले.

महापौर सुजाता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सलुजा सुतार यांच्या समन्वयातून आणि महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या सूचनेनुसार या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली व उपआयुक्त सोमनाथ पोटरे यांच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या या कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजनात समाजविकास विभागातील अधिकारी, समाजसेवक आणि समूह संघटकांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# दादर-भुसावळ खांदेश एक्स्प्रेसला बोईसर व डहाणू रोड येथे थांबा



**पालघर, दि. २३ (वार्ताहर) :** प्रवाशांच्या दीर्घकालीन मागणीला प्रतिसाद देत दादर-भुसावळ खांदेश एक्स्प्रेस (गाडी क्र. १९००३/१९००४) या रेल्वेगाडीला बोईसर आणि डहाणू रोड रेल्वे स्थानकांवर थांबा देण्यास रेल्वे मंत्रालयाने मंजुरी दिली आहे. यासोबतच या गाडीच्या फेऱ्यांमध्येही वाढ करण्यात आली असून, आता ही गाडी आठवड्यातून तीन दिवसांऐवजी सहा दिवस धावणार आहे. खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी बोईसर व डहाणू परिसरातील प्रवाशांच्या सोयीसाठी या गाडीला दोन्ही स्थानकांवर थांबा देण्याची मागणी रेल्वे मंत्रालयाकडे केली होती. यासंदर्भात त्यांनी ७ मार्च २०२६ आणि १६ एप्रिल २०२६ रोजी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना पत्र पाठवून स्थानिक नागरिकांच्या अडचणी मांडल्या होत्या. या मागणीची दखल घेत रेल्वे प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेतल्याची माहिती अधिकृत पत्राद्वारे देण्यात आली आहे.

बोईसर आणि डहाणू रोड परिसरातून दररोज मोठ्या संख्येने प्रवासी मुंबई, उत्तर महाराष्ट्र तसेच इतर भागांत प्रवास करतात. मात्र, या मार्गावरील महत्त्वाच्या गाड्यांना स्थानिक स्थानकांवर थांबा नसल्याने प्रवाशांना अतिरिक्त प्रवास करावा लागत होता. नव्या निर्णयामुळे या भागातील नागरिक, विद्यार्थी, व्यावसायिक आणि नोकरदार वर्गाला मोठा दिलासा मिळणार आहे. खांदेश एक्स्प्रेसच्या फेऱ्यांमध्ये वाढ झाल्याने उत्तर महाराष्ट्र आणि पालघर जिल्ह्यातील प्रवाशांसाठी रेल्वे संपर्क अधिक सुलभ होणार आहे.

# महावितरणकडून ५२ वीज ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण

**कल्याण, दि. २३ (वार्ताहर) :** महावितरणच्या बदलापूर विभागांतर्गत येणाऱ्या सोनिवली उपविभागातील ५२ वीज ग्राहकांच्या स्मार्ट मीटर तसेच वीज देयकांशी संबंधित तक्रारींचे यशस्वीपणे निराकरण करण्यात आले आहे. याबाबतची माहिती कार्यकारी अभियंता आनंद काटकर यांनी दिली.

बदलापूर परिसरातील वीज ग्राहकांना भेडसावणाऱ्या समस्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी महावितरणने विशेष पुढाकार घेतला आहे. मागील दोन दिवसांपासून बदलापूर विभागीय कार्यालयासह संबंधित उपविभागीय कार्यालयांमध्ये ग्राहकांच्या स्मार्ट मीटरविषयक शंका दूर करण्याचे काम करण्यात आले. यावेळी स्मार्ट मीटरची कार्यपद्धती, त्याचे फायदे आणि वीज वापरावर ठेवता येणारे नियंत्रण याबाबत ग्राहकांना सविस्तर माहिती देण्यात आली.

याशिवाय अनेक ग्राहकांनी वीज देयकांबाबत मांडलेल्या तक्रारींची तपासणी करून त्यांचे निराकरण करण्यात आले. काही प्रकरणांमध्ये देयकांमधील त्रुटी दुरुस्त करून सुधारित देयकेही उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे ग्राहकांना दिलासा मिळाला असून महावितरणच्या या उपक्रमाचे स्वागत करण्यात येत आहे.

बदलापूर शहर आणि परिसरातील ज्या वीज ग्राहकांना वीज देयक किंवा स्मार्ट मीटर संदर्भात काही शंका अथवा अडचणी असतील, त्यांनी खरवई आणि सोनिवली उपविभागीय कार्यालयांशी संपर्क साधावा, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे. ग्राहकांच्या समस्या तातडीने सोडविण्यासाठी महावितरण प्रशासन कटिबद्ध असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, **श्री. किरण किसन पवार आणि श्रीमती प्रिया किरण पवार** हे सर्व्हे क्र. २५८/१ आणि २५८/५, प्लॉट क्र. २ आणि ३ आणि घर क्र. ६/७५१/२, **गाव वाडा, तालुका वाडा आणि जिल्हा पालघर** येथे स्थित असलेल्या **"साई श्रद्धा अपार्टमेंट"** नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमधील **इमारत क्र. २ मधील** उंचावलेल्या **तळमजल्यावरील सदनिका क्र. ०२** चे मालक आहेत. नोंदणीकृत विक्री करारनामा दिनांक ५ ऑगस्ट २०१४ अन्वये श्री. अशोक मनोहर चौबल यांनी सदर सदनिका मे. एस. पी. क्रिएशन्स कडून खरेदी केली होती, जो दस्तऐवज अनुक्रम क्र. वाडा-१३२२-२०१४ अन्वये नोंदणीकृत आहे. श्री. अशोक मनोहर चौबल यांचे दिनांक ८ नोव्हेंबर २०२३ रोजी निधन झाले आणि त्यांच्या पत्नी तृप्ती अशोक चौबल यांचे दिनांक २५ ऑगस्ट १९९६ रोजी निधन झाले असून त्यांच्या पश्चात नरेश मनोहर चौबल हे एकमेव कायदेशीर वारसदार उरले आहेत. पुढे, नोंदणीकृत विक्री करारनामा दिनांक १३ मे २०२६, नोंदणी क्र. वाडा-३९६७-२०२६ अन्वये नरेश मनोहर चौबल यांनी सदर जागा श्री. किरण किसन पवार आणि श्रीमती प्रिया किरण पवार यांना विकली आहे.

वरील नमूद दस्तऐवजात आणि विक्री, बक्षीस, भाडेपट्टा, वारसाहक्क, विनिमय, गहाण, प्रभार, धारणाधिकार, ट्रस्ट, ताबा, सुखाचार, जप्ती याद्वारे अथवा इतर कोणत्याही प्रकारे उपरोक्त हस्तांतरणाच्या संदर्भात ज्या कोणाही व्यक्तीला कोणत्याही स्वरूपाचा दावा, हक्क, मालकीहक्क किंवा हितसंबंध असल्यास, त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून **७ दिवसांच्या** आत आपल्या आक्षेपाची माहिती ॲड. मॉन्सिला क्रास्टो यांच्याकडे लेखी स्वरूपात कळवावी, तसे न केल्यास अशा व्यक्ती किंवा व्यक्तींचे दावे, जर असतील तर, ते सर्व हेतूंसाठी आणि उद्देशांसाठी सोडून दिले आणि/किंवा त्यागले असल्याचे मानले जाईल.

**ॲड. मॉन्सिला क्रास्टो**
सदनिका क्र. ए/१०२, चावरे आर्केड सीएचएसएल, अभिनव हॉस्पिटलच्या वर, नालासोपारा (पश्चिम) - ४०१२०३.
स्थळ: मुंबई दिनांक : २४/०६/२०२६

## प्रोफेक्टस कॅपिटल प्रायव्हेट लिमिटेड

PROFECTUS CAPITAL

**नोंदणीकृत आणि कॉर्पोरेट कार्यालयाचा पत्ता:** ३बी, ३५ ते ४०, तिसरा मजला, फिनिक्स पॅरागॉन प्लाझा, एल.बी.एस. मार्ग, कुर्ला (पश्चिम), मुंबई - ४०००७०

**ताबा सूचना**
**(स्थावर मालमत्तेसाठी) सरफेसी कायदा आणि नियमांमधील नियम ८(१) पहा.**

ज्याअर्थी, खाली सही करणारे अधिकारी, **'प्रोफेक्टस कॅपिटल प्रायव्हेट लिमिटेड'** ज्याचे नोंदणीकृत कार्यालय ३बी, ३५ ते ४०, तिसरा मजला, फिनिक्स पॅरागॉन प्लाझा, एल.बी.एस. मार्ग, कुर्ला (पश्चिम), मुंबई येथे आहे यांचे प्राधिकृत अधिकारी म्हणून, 'सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२' (सरफेसी कायदा) अन्वये आणि कलम १३ (१२) सह नियम ३ सुरक्षा हितसंबंध अंमलबजावणी नियम, २००२ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, कर्जदार **१) रेक्सवेअर प्लास्टिक अँड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, २) दिगंबर जयराम चौधरी, ३) साईनाथ सखाराम गवारी, ४) सुनील दामोदर सावंत आणि ५) राजेंद्र देवराम गवारी** यांना **दि. ८ एप्रिल २०२६** रोजी मागणी नोटीस बजावून, त्या तारखेस देय असलेली **८३,३६,५७२/- रुपये (अक्षरी रुपये त्र्याऐंशी लाख छत्तीस हजार पाचशे बहात्तर मात्र)** इतकी रक्कम सदर नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत परतफेड करण्यास सांगितले होते;

आणि ज्याअर्थी, कर्जदाराने सदर रकमेची परतफेड करण्यात कसूर केली आहे, त्याअर्थी खालील कर्जदारांना आणि सर्वसाधारण जनतेला याद्वारे सूचित करण्यात येते की, खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा खाली सही करणाऱ्या अधिकाऱ्याने कायदा कलम १३ चे उप-कलम (४) आणि सुरक्षा हितसंबंध अंमलबजावणी नियम, २००२ चा नियम ८ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून **दि. १९ जून २०२६ आणि दि. २२ जून २०२६** रोजी घेतला आहे;

कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी या मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये; मालमत्तेबाबतचा कोणताही व्यवहार **'प्रोफेक्टस कॅपिटल प्रायव्हेट लिमिटेडच्या ८ एप्रिल २०२६** रोजीच्या **८३,३६,५७२/- रुपये (अक्षरी रुपये त्र्याऐंशी लाख छत्तीस हजार पाचशे बहात्तर मात्र)** इतक्या रकमेच्या व्याज आणि सर्व खर्च व शुल्कासह, बोज्याखाली असेल. तारण ठेवलेली मालमत्ता परत मिळवण्यासाठी उपलब्ध असलेल्या कालावधीबाबत, कायद्याच्या कलम १३ च्या पोट-कलम (८) मधील तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधले जात आहे.

**अचल मालमत्तेचे वर्णन**

| अ.क्र. | प्रकार | वर्णन |
|---|---|---|
| १ | मालमत्ता | मालमत्तेचे ठिकाणः सी-७, गाळा क्र. २४१ ते २४३, भूमी वर्ल्ड इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स, पिंपळास गाव, भिवंडी, ठाणे, महाराष्ट्र ४२१३०२ |
| २ | उपकरणे | यंत्राचा प्रकारः नवीन<br>यंत्राची श्रेणीः प्लास्टिक<br>यंत्राचे मॉडेलः आरआरएसी-३.५ आणि ६-एसी (पॅनेलसाठी) निर्माताः आरआर प्लास्ट एक्सट्रुशन्स प्रा. लि. |
| ३ | उपकरणे | यंत्राचा प्रकारः नवीन<br>यंत्राची श्रेणीः प्लास्टिक<br>यंत्राचे मॉडेलः आरआरव्हीएम/सी-१२०० व्हर्टिकल मिक्सर विथ सर्ज बिन निर्माताः आरआर प्लास्ट एक्सट्रुशन्स प्रा. लि. |
| | उपकरणे | यंत्राचा प्रकारः नवीन<br>यंत्राची श्रेणीः प्लास्टिक<br>यंत्राचे मॉडेलः आरआरव्हीएससी-३० - व्हायब्रो स्क्रीन क्लासिफायर निर्माताः आरआर प्लास्ट एक्सट्रुशन्स प्रा. लि. |
| ४ | उपकरणे | यंत्राचा प्रकारः नवीन<br>यंत्राची श्रेणीः प्लास्टिक<br>यंत्राचे मॉडेलः चिलर - २५टीआर निर्माताः आरआर प्लास्ट एक्सट्रुशन्स प्रा. लि. |
| ५ | उपकरणे | यंत्राचा प्रकारः नवीन<br>यंत्राची श्रेणीः प्लास्टिक<br>यंत्राचे मॉडेलः प्लास्टिक एक्सट्रूजन मशिनरी (आरआरएसएल १२०/४५व्ही३-१३२केवी (१००० मिमी) एसपी सिरीज पेट शीट लाईन<br>निर्माताः आरआर प्लास्ट एक्सट्रुशन्स प्रा. लि. |

स्थळः पुणे, महाराष्ट्र
दिनांकः २४/०६/२०२६
सही/-प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता,
प्रोफेक्टस कॅपिटल प्रायव्हेट लिमिटेड

## नमुना अ
## सार्वजनिक सूचना

**(इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्सी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तींसाठी दिवाळखोरी निवारण प्रक्रिया) विनियम, २०१६ च्या विनियम ६ अन्वये)**

**गॅलेक्सी आयईसी इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंच्या माहितीसाठी**

**संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | गॅलेक्सी आयईसी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड |
| २ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेची तारीख | १०.०८.२०१० |
| ३ | ज्या प्राधिकरणांतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणी झाली आहे ते प्राधिकरण | रजिस्ट्रार ऑफ कंपनीज - मुंबई |
| ४ | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | यु७४१४०एमएच२०१०पीटीसी२०६४५६ |
| ५ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि मुख्य कार्यालयाचा (असल्यास) पत्ता | आरपी-१४, गॅलेक्सी हाऊस, रोड क्र. ५, सुदामा नगर, डोंबिवली पूर्व, ठाणे - ४२१२०१, महाराष्ट्र |
| ६ | कॉर्पोरेट कर्जदारासंदर्भात दिवाळखोरी प्रक्रिया सुरू झाल्याची तारीख | १९.०६.२०२६ (२१.०६.२०२६ रोजी ऑर्डर प्राप्त झाली) |
| ७ | दिवाळखोरी निवारण प्रक्रिया पूर्ण होण्याची अंदाजित तारीख | १९.१२.२०२६ |
| ८ | अंतरिम निवारण व्यावसायिक म्हणून काम करणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | श्री. कृष्ण गोपाल रतनलाल महेश्वरी आयबीबीआय/आयपीए-००१/आयपीपी-०१२९६/२०१९-२०२०/१२७१२ |
| ९ | मंडळाकडे नोंदणीकृत असलेला अंतरिम निवारण व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | **पत्ताः** ६०२, राजेंद्र रत्न, महेश नगर, एस व्ही रोड, गोरेगाव (प), मुंबई सिटी, महाराष्ट्र, ४००१०४<br>**ईमेलः** 1kgmaheshwari@gmail.com |
| १० | अंतरिम निवारण व्यावसायिकाशी पत्रव्यवहारासाठी वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | **ईमेलः** cirp.galaxyiec@gmail.com<br>**पत्ताः** प्राइमस इन्सॉल्व्हन्सी रिझोल्यूशन अँड व्हॅल्युएशन प्रा. लि., ४०८, चौथा मजला, मनीष चेंबर्स, सोनावाला रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०००६३ |
| ११ | दावे सादर करण्याची अंतिम तारीख | ०६.०७.२०२६ |
| १२ | अंतरिम निवारण व्यावसायिकाने निश्चित केलेले, कलम २१ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अंतर्गत येणारे धनकोंचे गट (असल्यास) | शून्य |
| १३ | एखाद्या गटातील धनकोंचे 'अधिकृत प्रतिनिधी' म्हणून काम करण्यासाठी निवडलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक गटासाठी तीन नावे) | लागू नाही |
| १४ | (अ) संबंधित फॉर्म्स आणि<br>(ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील येथे उपलब्ध आहेः | https://ibbi.gov.in/home/downloads |

याद्वारे सूचित करण्यात येते की, नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल, मुंबई खंडपीठाने दि. १९.०६.२०२६ रोजी 'मेसर्स गॅलेक्सी आयईसी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' यांच्या कॉर्पोरेट दिवाळखोरी निवारण प्रक्रियेस सुरुवात करण्याचे आदेश दिले आहेत (आदेशाची प्रत दि.२२.०६.२०२६ रोजी प्राप्त झाली).
'मेसर्स गॅलेक्सी आयईसी इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना याद्वारे आवाहन करण्यात येते की, त्यांनी त्यांचे दावे पुराव्यासह, अनुक्रमांक १० समोर नमूद केलेल्या पत्त्यावर 'अंतरिम रिझोल्यूशन प्रोफेशनल' यांच्याकडे दि. ०६.०७.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी सादर करावेत.
वित्तीय धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारेच सादर करावेत. इतर सर्व धनको त्यांचे दावे पुराव्यासह प्रत्यक्ष, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे सादर करू शकतात.
दाव्यासाठी खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल.

सही/-
कृष्ण गोपाल रतनलाल महेश्वरी
अंतरिम रिझोल्यूशन प्रोफेशनल

दिनांकः २३ जून २०२६ नोंदणी क्रमांकः आयबीबीबीआय/आयपीए-००१/आयपीपी-०१२९६/२०१९-२०२०/१२७१२
स्थळः मुंबई असाइनमेंटसाठीचे अधिकृत दि. ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत वैध

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that my client states that **Shri Ramdas Jagannath Gujarathi** was holding, Flat No. B-45, admeasuring 570 sq.ft. built-up area on the 4th Floor, in the 'B' Wing in the society known as **"TORNA CO-OP. HOUSING SOCIETY LIMITED"** Situated at Plot No. 675-676, TPS-III, Ram Nagar, Borivali (West), Mumbai- 400092 (hereinafter referred to as "the said flat") along with 5 (Five) fully paid shares of Rs.50/- each bearing distinctive Nos.186 to 190 (both inclusive) represented by Share Certificate No.17B.

Shri Ramdas Jagannath Gujarathi expired on 23-8-2019, his Wife-Mrs. Ashalata Ramdas Gujarathi expired on 13-2-2023 & his Son Mr. Vivek Ramdas Gujarathi predeceased him on 18-12-2016, eaving behind him the following legal heirs:
**a)** Mr. Avinash Ramdas Gujarathi (Son), **b)** Mrs. Shubhangi Amul Shah (Married Daughter), **c)** Mrs. Nivedita Vivek Gujarathi (Daughter-in-law and wife of Late Mr.Vivek Ramdas Gujarathi), **d)** Ms. Drishti Vivek Gujarathi ( Grand Daughter and daughter of Mr. Vivek Ramdas Gujarathi)

The aforementioned legal heirs have requested the society i.e., **"TORNA CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED"** for transfer and release of their inherited shares in favour of **MRS. SHUBHANGI AMUL SHAH** and have submitted necessary transfer forms and release deed dated 29th May, 2026 vide Registration No.MBI17-10240-2026 in the society office.

Any person or persons having any right, title or claim against the said flat & shares should send their claims in writing to the undersigned along with the documentary evidence in support of the said claim thereof **within 15 days** of publication of the said Notice, failing which claims if any shall be deemed to have been waived.

**Sd/- ANUJ Y. RAVAL-Advocate, High Court,**
**Date: 24-6-2026. C-101, Anshul Heights Chsl, Near Kandivali Metro Station, Off Link Road, Mahavir Nagar Extension, Kandivali (W), Mumbai-67.**
**Contact: 7303170008 Email: camcons@gmail.com**

## मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड

motilal oswal Home Finance

**नोंदणीकृत कार्यालयः** मोतीलाल ओसवाल टॉवर, रहिमतुल्ला सयानी रोड, परळ एसटी डेपोसमोर, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५, संपर्कः ८२९१८८९८९८
**संकेतस्थळः** www.motilaloswalhf.com, **ई-मेलः** hfquery@motilaloswal.com

**ई-लिलाव व विक्रीसाठी जाहीर सूचना**

**'सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२' (सरफेसी कायदा) आणि त्यासोबत 'सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, २००२' मधील नियम ८ व ९ च्या तरतुदींनुसार, स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी १५ दिवसांची ई-लिलाव विक्री सूचना.**
सर्वसाधारण जनता आणि विशेषतः कर्जदार/हमीदार/तारणकर्ते यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, 'मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड' (पूर्वीची 'अस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड') कडे तारण ठेवलेली खाली नमूद केलेली मालमत्ता, येणे बाकी रक्कम आणि त्यावरील पुढील व्याज, शुल्क व खर्च इत्यादींच्या वसुलीसाठी 'ऑनलाइन ई-लिलाव' पद्धतीने विकली जाईल. ही विक्री 'जशी आहे तशी', 'ज्या स्थितीत आहे तशी' आणि 'जी काही आहे तशी' या तत्त्वांवर 'motilaloswalhf.com' या संकेतस्थळाद्वारे केली जाईल; ज्याचा तपशील खालीलप्रमाणे आहेः

**ई-लिलावाची तारीख आणि वेळः १६-०७-२०२६ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी ०२:०० वाजेपर्यंत (प्रत्येकी १५ मिनिटांच्या अमर्यादित मुदतवाढीसह).**

| कर्जदार/जामीनदार/ कर्ज खाते | मागणी नोटीसची तारीख आणि रक्कम | अचल मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत, ईएमडी / ईएमडी भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|
| LAN: LXPAN00315-160007379<br>शाखा : पनवेल<br>कर्जदारः भास्कर दत्ताराय राऊत<br>सह-कर्जदारः मनीषा भास्कर राऊत | १२-१२-२०२५ रोजीसाठी<br>रु. १९,०७,६६७/-<br>(अक्षरी रुपये एकोणीस लाख सात हजार सहाशे सदुसष्ठ फक्त) | फ्लॅट क्र. १०५ आणि १०६, पहिला मजला, क्षेत्रफळ ७१० चौ. फूट (बिल्ड-अप), 'नयन अपार्टमेंट' नावाची इमारत; ही इमारत सर्व्हे क्र. १२/ए, हिस्सा क्र. १/९, अंदाजित क्षेत्रफळ सुमारे २३० चौ. मीटर, या जमिनीवर बांधलेली आहे; गाव - द्वारली, तालुका - अंबरनाथ, जिल्हा - ठाणे, उप-निबंधक - उल्हासनगर, महाराष्ट्र. | राखीव किंमतः रु. ८,००,०००/-<br>(केवळ आठ लाख रुपये)<br>ईएमडी : रु. ८०,०००/-<br>(केवळ ऐंशी हजार रुपये)<br>ईएमडी जमा करण्याची अंतिम तारीखः १५-०७-२०२६ |

१. ही लिलाव प्रक्रिया 'बोली दस्तऐवजातील' अटी व शर्ती आणि त्यामध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार राबविली जाईल. बोली लावण्यासाठी आवश्यक माहिती व सहाय्य, ई-लिलावासाठी ठेवलेल्या सुरक्षित मालमत्तेचा तपशील आणि ऑनलाइन सादर करावयाचा 'बिड फॉर्म' मिळवण्यासाठी, इच्छुक बोलीदार आमचे ई-लिलाव सेवा पुरवठादार **'मेसर्स क्रेडरिझोल्यूशन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' यांच्या https://www.credauction.com या वेब पोर्टलला भेट देऊ शकतात.** इच्छुक खरेदीदार याच पोर्टलवर लिलावाच्या अटी व शर्ती तसेच प्रक्रियेची माहिती पाहू शकतात. तसेच, पोर्टलवर उपलब्ध असलेल्या तपशिलानुसार **राकेश मनोहर कंदारे - ९९६७३३७२८८ आणि सुनील श्यामलाल कैथल - ९८९२७७६३२० यांच्याशी किंवा त्यांच्या 'सेंट्रलाइज्ड हेल्प डेस्क'शी +९१ ९१३७१०००२० / ई-मेलः balram@credsolv.com) संपर्क साधू शकतात.**

ठिकाण : महाराष्ट्र /तारीख : २४.०६.२०२६
सही/-, प्राधिकृत अधिकारी, मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड
*भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.
(पूर्वी अस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)

## जाहीर सूचना

**याद्वारे सूचना देण्यात येते की,** आमचे अशिल खालील गोष्टी खरेदी करण्यास इच्छुक आहेतः **सौ. आरती दिनेश पारेख** यांच्याकडून, खालील अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या, **जुहू महावीर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेडमधील** फ्लॅट क्र. ०२ तसेच त्यास अनुषंगिक असलेले व उक्त सोसायटीने जारी केलेले शेअर्स (यापुढे **"सदर मालमत्ता"** असे संबोधण्यात येईल), कोणत्याही प्रकारच्या बोजा, तारण, हक्क, दावे किंवा इतर अडथळ्यांपासून मुक्त, स्पष्ट व विक्रीयोग्य हक्कासह तसेच रिकाम्या व शांततापूर्ण ताब्यासह खरेदी करण्याचा मानस बाळगत आहेत. सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात कोणत्याही व्यक्तीस कोणताही हिस्सा, हक्क, मालकीहक्क, लाभ, मागणी, दावा किंवा स्वारस्य करार, संविदा, विक्री, गहाण, भेट, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, परवाना, वारसा, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, न्यायालयाचा हुकूम किंवा आदेश, प्रभार, धारणाधिकार, विश्वस्त व्यवस्था, जप्ती, उपभोगाधिकार, करारातील अटी, ताबा किंवा अन्य कोणत्याही प्रकारे असल्यास किंवा दावा करीत असल्यास, अशा सर्व व्यक्तींनी त्यांचे दावे व त्यासंबंधीची पुराव्याची कागदपत्रे खाली नमूद केलेल्या पत्त्यावर व ई-मेलवर या सूचनेच्या तारखेपासून **१५ दिवसांच्या आत** लेखी स्वरूपात सादर करावीत. अन्यथा, अशा प्रकारचे दावे, असल्यास, विचारात घेतले जाणार नाहीत व ते दावे संबंधित व्यक्तींनी सोडून दिलेले व त्याग केलेले मानले जातील आणि आमचे अशील अशा दाव्यांचा कोणताही संदर्भ न घेता व त्यांची दखल न घेता वरील मालमत्तेची खरेदी प्रक्रिया पुढे सुरू करतील.

**अनुसूची**

'अशू महावीर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लिमिटेड' त्यांचा पत्ताः खंडूभाई रोड, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई-४०००५६; सर्व्हे क्र. ३८७/बी/ए (भाग), गाव विलेपार्ले, तालुका अंधेरी, नोंदणी जिल्हा मुंबई उपनगर या सोसायटीमधील फ्लॅट क्र. ०२, ज्याचे क्षेत्रफळ ४९९.२३ चौ. फूट / ४६.४० चौ. मीटर 'बिल्ट-अप' क्षेत्र आहे. याच्याशी संबंधित लाभार्थी हक्क, अधिकार आणि हिश्श्यासह; तसेच दि. ७ जून १९७५ रोजीच्या शेअर प्रमाणपत्र क्र. ०२ अंतर्गत येणारे, प्रत्येकी ५०/- रुपये (अक्षरी पन्नास रुपये) दर्शनी मूल्य असलेले आणि ०६ ते १० ज्यामध्ये दोन्ही क्रमांक समाविष्ट असे विशिष्ट क्रमांक असलेले ५ (पाच) पूर्ण भरणा झालेले शेअर्स त्यांचे एकूण मूल्य २५०/- रुपये इतके आहे.

दिनांक : २४ जून, २०२६

सही/-
**ॲड. संदीप मनुबरवाला**
डी/५०२, २/३/४, मनीष गार्डन सीएचएसएल, मनीष नगर, ४ बंगला, अंधेरी (पश्चिम), मुंबई – ४०० ०५३
ई-मेल : sandeepmanubarwala@gmail.com
मोबा. क्र. : ९८२०४४४७८३

## अपना सहकारी बँक लि.
## APNA SAHAKARI BANK LTD.

मल्टी स्टेट शेड्युल्ड बँक
आपली माणसं... आपली बँक
Multi State Scheduled Bank

**नोंदणी कार्यालय :** अपना बाजार, १०६–ए, नायगांव, मुंबई ४०००१४.
**कॉर्पोरेट कार्यालय :** अपना बँक भवन, डॉ. एस. एस. राव रोड, परेल, मुंबई ४०००१२. दुरध्वनी :– ०२२–२४१६ ४८६० / २४१० ४८६१–६२. विस्तार : १०८, १०९, १११. फॅक्स : ०२२–२४१० ४६८०.
ई–मेल : corporateoffice@apnabank.co.in वेब : www.apnabank.co.in.

**विक्रीबाबत सूचना**

सिक्यूरीटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनानशियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्यूरीटी इंटरेस्ट वटहूकूम २००२ –(सरफेसी कायदा) सह सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ अन्वये बँकेच्या ताब्यात असलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीबाबत **''जेथे आहे आणि जसे आहे''** या तत्वावर विक्री कारवाई करीत आहे.

| | |
|---|---|
| **कर्जदार /मालक/ सह–कर्जदार / जामीनदार/ गहाणखतदार यांची नावे** | १. मे. श्री. एंटरप्रायझेस, २.सौ. संयुक्ता अशोक सिंग (कर्जदार/मालक/गहाणखतदार),३. श्री. अशोक उमेश सिंग (सह–कर्जदार/गहाणखतदार), ४. सौ. गायत्री प्रविण कोटियन (जामिनदार), ५. श्री. अखिलेश सिंग (जामिनदार) |
| **येणेबाकी रक्कम** | **रु. १९,६६,०८४.२८ (रुपये एकोणीस लाख सहासष्ठ हजार चौऱ्यांशी आणि पैसे अठ्ठावीस फक्त) दि. ३०.११.२०२४ रोजी येणारे + दि. ०१.१२.२०२४ पासून त्यावरील पुढील होणारे व्याज इ.** |

**मालमत्तेचा तपशिल :** गाव पालघर, ता. पालघर, जि. पालघर येथील सर्व्हे नं. ४१४/१,२,३ आणि ९२४, ८२७/३ (भाग), **मेसर्स आशिर्वाद डेव्हलपर संबंधित 'साई आशिर्वाद'** मधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं. बी– १०२, बिल्ट अप क्षेत्र ४५.३४ चौ.मि.

| राखीव किंमत | रु. १८,००,९००.०० | इसार अनामत रक्कम | रु. १,८०,०९०.०० | बोली वाढ रक्कम | रु. ५०,०००.०० |
|---|---|---|---|---|---|

**अटी व शर्ती**

✲ उपरोक्त स्थावर मालमत्तेकरिता असणारी मालमत्ता कर, विक्री कर, एक्साईज ड्यूटी, डॉक्युमेंटसाठीचे सेज चार्जस, हस्तांतर शुल्क, प्रवास शुल्क, स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन फी इ. काही शिल्लक असल्यास यशस्वी बोलीदाराने एकट्याने भरणे बंधनकारक असेल.

१. सदर विक्री या जाहिरातीत आणि निर्धारित निविदेतील कागदपत्रांमध्ये असलेल्या अटी व शर्ती आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियम २००२ आणि सरफेसी कायद्या नुसारच होईल. मालमत्ता विक्रीकरिता विहित निविदा **अपना सहकारी बँकेच्या कॉर्पोरेट ऑफिस, अपना बँक भवन, डॉ. एस. एस. राव रोड, परेल– ४०००१२ वसुली विभागात सोमवार ते गुरुवार दरम्यान दि. २४.०७.२०२६ पर्यंत स. १०.०० ते सायं. ६.०० या वेळेत** उपलब्ध असतील.
२. **मालमत्तेचे निरीक्षण अथवा तपासणी दि. १५.०७.२०२६ रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ४.००** वाजेपर्यंत देण्यात येईल. कृपया नोंद घ्यावी की **अपना सहकारी बँक लि.** ला पूर्व सूचना देऊन व त्यांचेकडून वेळ निश्चित झाल्यावरच तारणाची पाहणी करता येईल. प्रत्येक बोलीदाराला एकापेक्षा अधिक वेळा तारणाची पाहणी व तपासणी करता येणार नाही.
३. इच्छुक बोलीदारांनी राखीव किंमतीच्या १० % बयाणा रक्कम एनइएफटी /आरटीजीएस मार्फत **खाते क्रमांक : ००२९९९२००००००३२ सरफेसी कायद्याअंतर्गत खाते मे. श्री. एंटरप्रायझेस, यांच्या मिळकतीची विक्री, ईएमडी खाते, अपना सहकारी बँक लि., परेल, मुंबई– १२ आयएफएससी कोड: ASBL0000002** वर **दि. २७.०७.२०२६ रोजी सायं. ०५.०० वा.** पर्यंत जमा करावी. रोख/चेक/डीमांड ड्राफ्ट द्वारे इसारा ठेव स्विकारली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.
४. **दि. २८.०७.२०२६** रोजी सायंकाळी ५.०० वाजता **अपना सहकारी बँक लि., कॉर्पोरेट ऑफिस, अपना बँक भवन, डॉ. एस. एस. राव रोड, परेल – ४०० ०१२** या पत्त्यावर निम्नस्वाक्षरीकाराकडून विहीत वेळेत प्राप्त झालेल्या निविदा उघडण्यात येतील. निविदाकार स्वत: उपस्थित राहून निविदा उघडल्यानंतर प्रस्तावाची रक्कम वाढवू शकतील. अयशस्वी बोलीदार / देकारकर्ते यांना अनामत ठेव रक्कमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.
५. इच्छा असल्यास, निविदा कागदपत्रात नमूद केलेल्या व या नोटीसीत उल्लेखिलेल्या अटी व शर्ती पूर्ण होत असल्यास कर्जदार/जामिनदारही या लिलाव प्रक्रीयेत सहभागी होऊ शकतील.
६. यशस्वी बोलीदार /देकारकर्ते यांनी पुढील एक दिवसाच्या आत अथवा अधिकृत अधिकारी यांनी वाढवून दिलेल्या मुदतीत २५% रक्कम भरावी व उर्वरित रक्कम निविदा उघडण्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत भरावी.
७. जर यशस्वी बोलीदार उर्वरीत ७५% रक्कम निविदा उघडण्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत अथवा अधिकृत अधिकारी यांनी वाढवून दिलेल्या मुदतीत, रोखीने अथवा डीडी अथवा आरटीजीएस/एनईएफटी द्वारा भरण्यास अयशस्वी ठरले, तर बयाणा रक्कम जप्त केली जाईल.
८. सर्वोच्च बोली स्विकारण्यास अधिकृत अधिकारी बांधील नाहीत आणि कोणतीही किंवा सर्व बोली स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार किंवा लिलाव कोणतेही कारण न देता तहकूब करण्याचा/पुढे ढकलण्याचा/रद्द करण्याचा अधिकार अधिकृत अधिकारी राखून ठेवत आहेत.
९. सर्व प्राप्त निविदा उघडल्यानंतर इच्छुक बोलीदारांना मा. अधिकृत अधिकारी यांचे इच्छेनुसार एकमेकात चर्चा करुन निविदा रक्कम वाढविण्याची संधी मिळू शकते
१०. वर उल्लेखिलेल्या दिनांकास व वेळेत मिळकत पाहण्याची परवानगी मिळेल.
११. सदर नोटीस ही कर्जदार/जामीनदार यांना तारण मिळकतीची लिलावाने विक्री केली जात असल्याची नोटीसही समजावी.
१२. अधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहिती आणि समजुतीप्रमाणे मिळकती/तींवर कोणतेही भार नाहीत. तथापि, इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी लिलावात ठेवलेल्या मिळकती/ तींचे भार, हक्क आणि मिळकतीस बाधा आणणाऱ्या दावे/अधिकार/देणी याबाबत स्वत: स्वतंत्र चौकशी करावी.

**मालमत्तेच्या संदर्भातील अधिक माहितीसाठी तसेच निविदा फॉर्म, अटी व शर्तीसाठी येथे नमुद केलेल्या नंबरवर संपर्क साधणे ०२२–२४१०४८६१/६२/६५**
**विस्तार: १०८, १०९, १११. मो. नं. ९८१९०७२१५९**

**सरफायसी कायदा २००२ च्या अन्वये ३० दिवसांची वैधानिक सूचना**

कर्जदार/ जामीनदार यांना या नोटीशीद्वारे सूचित करण्यात येते की सरफेसी कायदा कलम १३ च्या उप कलम ८ नुसार त्यांनी लिलावाचे तारखेपूर्वी कधीही सर्व येणे रक्कम/खर्च/शुल्क इत्यादीचा भरणा करावा. अन्यथा वर उल्लेखिल्याप्रमाणे सदर मालमत्ता लिलावाद्वारे विक्री करण्यात येऊन, जर त्यातून संपूर्ण रकमेची परतफेड झाली नाही तर उर्वरित रक्कम व्याज खर्चासह वसूल करण्यासाठी बँक पुढे कार्यवाही करेल.

**दिनांक : २४.०६.२०२६**
**ठिकाण : पालघर**
**(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)**
**सही/–**
**अधिकृत अधिकारी**
**कॉर्पोरेट ऑफिस**

## जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापनात)

नोंदणीकृत कार्यालय - स्टर्लिंग सेंटर, ४०१-४०७, ४था मजला, डिव्हाईन चाइल्ड हायस्कूलसमोर, अंधेरी कुर्ला रोड, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३ सीआयएनः एल९९९९९एमएच१९९२पीएलसी०६६२१३
(माननीय एनसीएलटीच्या दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ रोजीच्या आदेशान्वये परिसमापन प्रक्रियेतून जात असलेली कंपनी)

**ई-लिलावांसाठी जाहीर निवेदन**

**इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्सी कोड, २०१६ व त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमावलीअन्वये सूचना**

अधोस्वाक्षरीकाराद्वारे सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की, इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्सी कोड, २०१६ **("आयबीसी")** व त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियम व नियमावलीच्या तरतुदींन्वये, **जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड** (परिसमापनात) **("कॉर्पोरेट कर्जदार")** च्या मालकीच्या सात (७) मालमत्तांच्या (खालील तक्त्यात वर्णन केल्याप्रमाणे) विक्रीसाठी बोली आमंत्रित करणारे ई-लिलाव, ज्या कॉर्पोरेट कर्जदाराच्या परिसमापन इस्टेटचा भाग आहेत, "जशी आहे तशी जेथे आहे त्या आधारावर", "जशी आहे जे आहे त्या आधारावर", "जशा स्थितीत आहे त्या आधारावर", "जे काही आहे त्या आधारावर" आणि "कोणताही सहारा न घेता त्या आधारावर" आणि कोणतेही प्रतिनिधित्व, हमी किंवा क्षतिपूर्तीशिवाय आयोजित करण्यात येत आहेत.

विक्री अधोस्वाक्षरीकाराद्वारे ई-लिलाव पोर्टल baanknet (पूर्वी eBKray) द्वारे **https://ibbi.baanknet.com ("ई-लिलाव पोर्टल")** वर, आयबीबीआय (लिक्विडेशन प्रोसेस) रेग्युलेशन्स, २०१६ च्या रेग्युलेशन ३२ व दिनांक २४ जून, २०२६ रोजीच्या असेट सेल प्रोसेस मेमोरँडा **("एएसपीएम्स")** अन्वये केली जाईल. सर्व इच्छुक बोलीदारांनी नोंद घ्यावी की सर्व पात्रता दस्तऐवज व बयाणा रक्कम संबंधित एएसपीएम्सच्या कलम ४ (पात्रता दस्तऐवज) मध्ये नमूद दस्तऐवज सादर करण्याच्या आवश्यकतांनुसार काटेकोरपणे व केवळ ई-लिलाव पोर्टलवरच सादर करावेत.

**ई-लिलावांसाठी महत्त्वाच्या तारखांचे वेळापत्रक**

| | |
|---|---|
| ई-लिलाव पोर्टलवर पात्रता दस्तऐवज व कलम २९-ए हमीपत्र सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ | **रविवार, २६ जुलै, २०२६, सायंकाळी ५:०० (यूटीसी+५:३०)** |
| ई-लिलाव पोर्टलवर बयाणा रक्कम ("ईएमडी") जमा करण्याची अंतिम तारीख व वेळ | रविवार, २६ जुलै, २०२६, रात्री ८:०० (यूटीसी+५:३०) |
| ई-लिलावांचा दिनांक | **मंगळवार, २८ जुलै, २०२६** |
| अंतिम विक्री मोबदला भरण्याची मुदत | अधोस्वाक्षरीकाराद्वारे अंतिम विक्री मोबदल्याच्या मागणी पत्राच्या जारी झाल्यापासून साठ (६०) दिवसांच्या आत |

| अ. क्र. | मालमत्तेचे वर्णन | असेट आयडी | लिलाव आयडी | राखीव किंमत* | बयाणा रक्कम (ईएमडी) | वाढीव मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ए३३० / ए३३२ / ए३४३ – वाइड बॉडी एअरबस | ४२२५ | ४००२ | **९,३९,५०,३४७** | ९३,९५,०३५ | ४६,९७,५१७ |
| २ | बी७७७ – वाइड बॉडी बोईंग | ४२२६ | ४००३ | **१३,६०,३९,८४८** | १,३६,०३,९८५ | ६८,०१,९९२ |
| ३ | मिक्स्ड वाइड बॉडी – ए३३०/बी७७७/क्लासिक्स | ४२२७ | ४००४ | **३,३२,७६,८२८** | ३३,२७,६८३ | १६,६३,८४१ |
| ४ | क्रॉस-प्लॅटफॉर्म (सर्व विमान प्रकार) | ४२२८ | ४००५ | **६१,४४,८३६** | ६,१४,४८४ | ३,०७,२४२ |
| ५ | लेगसी, संमिश्र व अवर्गीकृत | ४२२९ | ४००६ | **२३,४०,१५,७३४** | २,३४,०१,५७३ | १,१७,००,७८७ |
| ६ | ऑपरेटर-विशिष्ट सानुकूलित वस्तू (ड्रेस कव्हर्स, आर्मकॅप्स, डेकल्स) | ४२३० | ४००७ | **३,२६,१०,८५९** | ३२,६१,०८६ | १६,३०,५४३ |
| ७ | ग्राउंड सपोर्ट इक्विपमेंट व टूलिंग | ४२३१ | ४००८ | **५,४४,४५८** | ५४,४४६ | २७,२२३ |

*कर, अधिभार, शुल्क, ड्युटी, हस्तांतरण शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, प्रिमियम आणि संबंधित एएसपीएम्सच्या कलम १९ (खर्च, व्यय व कर परिणाम) मध्ये अधिक विशेषतः वर्णन केलेल्या विक्री पूर्ण करण्यासाठी लागू असलेल्या इतर सर्व आवश्यक खर्चांसह, इतर बाबी वगळून. अधोस्वाक्षरीकार किंवा क्षतिपूर्ती प्राप्त पक्षांद्वारे (संबंधित एएसपीएम्समध्ये परिभाषित केल्याप्रमाणे) कोणतेही प्रतिनिधित्व, हमी किंवा क्षतिपूर्ती दिली जाणार नाही.

**महत्त्वाच्या टीपाः**

१. वरील नमूद सात (७) मालमत्तांसाठी बाँकनेट पोर्टलवर सात (७) स्वतंत्र ई-लिलाव आयोजित केले जातील.
२. ही विक्री सूचना संबंधित एएसपीएम्ससह वाचली जावी, ज्यामध्ये मालमत्तेचा तपशील, घोषणा, प्रतिज्ञापत्रे व आयबीसीच्या कलम २९-ए अन्वये पात्रतेसाठीची हमीपत्रे, तसेच 'ई-लिलाव विक्रीच्या सर्वसाधारण व तांत्रिक अटी व शर्ती' समाविष्ट आहेत, जी बाँकनेटवर **https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/auc-listing** येथे वरील असेट व लिलाव आयडींविरुद्ध किंवा कॉर्पोरेट कर्जदाराच्या **www.jetairways.com** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
३. सर्व विदेशी बोलीदारांनी त्यांच्या सहभागासाठी संबंधित एएसपीएम्सच्या पुरवणीची नोंद घ्यावी. विदेशी बोलीदारांना विशेषतः विनंती करण्यात येते की त्यांनी दिनांक २४ जून, २०२६ रोजीच्या संबंधित एएसपीएम्सच्या पुरवणीत नमूद विहित नोंदणी प्रक्रिया, कालमर्यादा, पात्रता निकष व ईएमडी सादर करण्याच्या आवश्यकतांचे पालन करावे.
४. इच्छुक बोलीदारांनी आवश्यक पात्रता दस्तऐवज व ईएमडी केवळ व काटेकोरपणे ई-लिलाव पोर्टलद्वारे, संबंधित एएसपीएम्सच्या कलम ४ (पात्रता दस्तऐवज) अनुसार विहित कालमर्यादेत सादर करावेत, परिसमापकाकडे नव्हे.
५. ई-लिलाव पोर्टल व दस्तऐवज तसेच ईएमडी सादर करण्याबाबत कोणत्याही प्रश्नांसाठी, इच्छुक बोलीदारांनी बाँकनेटशी +९१ ८२९१२२०२२० व support.baanknet@psballiance.com वर संपर्क साधावा.
६. ई-लिलावाच्या प्रक्रियेबाबत कोणत्याही प्रश्नांसाठी, कृपया परिसमापकाचे प्राधिकृत प्रतिनिधी **श्री. श्लोक नंदनपवार (+९१-८२०८५०३६९३) यांच्याशी jetliquidation@in.ey.com व liquidation.jet@gmail.com** वर "Engineering Asset Sale – Delhi Consumables" या विषय ओळीसह संपर्क साधावा. कृपया नोंद घ्यावी की, पात्रतेशी संबंधित कोणतेही दस्तऐवज व बोली परिसमापक, त्यांचे प्रतिनिधी किंवा त्यांचे सल्लागार यांच्याकडे सादर करू नये.
७. हे स्पष्ट करण्यात येते की ही सूचना अधोस्वाक्षरीकार किंवा जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापनात) यांच्यावर विक्री प्रत्यक्षात आणण्याचे कोणतेही बंधनकारक दायित्व निर्माण करत नाही. अधोस्वाक्षरीकाराने घेतलेला कोणताही निर्णय अंतिम व सर्व इच्छुक बोलीदारांवर बंधनकारक असेल.
८. हे स्पष्ट करण्यात येते की येथे व संबंधित एएसपीएम्समध्ये नमूद मालमत्तेचा तपशील केवळ सर्वसाधारण संदर्भासाठी दिला आहे. क्षतिपूर्ती प्राप्त पक्ष (संबंधित एएसपीएम्समध्ये परिभाषित केल्याप्रमाणे) मालमत्तेच्या वर्णन किंवा स्थितीतील कोणत्याही प्रकारच्या त्रुटी/अचूकता/विसंगती/चुकीचे विधान/वगळणे/फरक/तुटवडा किंवा त्रुटीबाबत, मग अशी विसंगती ई-लिलाव पूर्ण होण्यापूर्वी, दरम्यान किंवा नंतर आढळून आली असो, कोणतेही दायित्व किंवा जबाबदारी स्पष्टपणे नाकारतात व त्यांना ती राहणार नाही. मालमत्तेची विक्री काटेकोरपणे 'जशी आहे तशी जेथे आहे त्या आधारावर', 'जशी आहे जे आहे त्या आधारावर', 'जशा स्थितीत आहे त्या आधारावर' आणि 'कोणताही सहारा न घेता त्या आधारावर' आणि कोणतेही प्रतिनिधित्व, हमी किंवा क्षतिपूर्तीशिवाय आयोजित केली जात आहे.
९. अंतिम विक्री मोबदल्याचे देयक संबंधित एएसपीएम्सच्या कलम १५ (अंतिम विक्री मोबदल्याचे देयक) व कलम १६ (विक्री पूर्ण होणे) मध्ये नमूद कालमर्यादा, व्याज तरतुदी व जप्ती अटींच्या अधीन आहे.
१०. परिसमापक, कॉर्पोरेट कर्जदाराच्या धनको समितीच्या सल्ल्यानुसार, लागू कायद्यान्वये अन्यथा तरतूद केल्याशिवाय, कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर ई-लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचा किंवा थांबवण्याचा अधिकार राखून ठेवतो.

**सही/–**
**सतीश कुमार गुप्ता**
जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेडचे परिसमापक
आयपी नोंदणी क्र.ः आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी०००२३/२०१६-१७/१००५६
एएफए क्र.ः एए१/१००५६/०२/३११२२६/१०८४५४
**दिनांकः २४.०६.२०२६** एएफए वैध तारीख ३१ डिसेंबर, २०२६ पर्यंत
**स्थळः मुंबई** **ईमेल – liquidation.jet@gmail.com**